महावितरण
महाराष्ट्र राज्य विद्युत वितरण कंपनी मर्या.

क्र.साप्रवि/रवका/न.क्र.५/
**महाराष्ट्र राज्य विद्युत वितरण कंपनी मर्या.**
एस्ट्रेला बॅटरीज विस्तारित इमारत,
तळ मजला, धारावी रोड, माटुंगा,
मुंबई - ४०० ०१९.

# प्रशासकीय परिपत्रक क्र. १०६ दिनांक १०/०५/२००७

विषय : कर्मचाऱ्यांनी मुख्यालयाच्या ठिकाणी रहाणेबाबत

संदर्भ : १) परिपत्रक क्र. MZ/Misc/Spe/6914 dtd. 16/07/90
२) परिपत्रक क्र. MZ/Misc/Spe/31867dtd.24/09/90
३) प्रशासकीय परिपत्रक क्र. ३८५ दिनांक २९/०३/२००३
४) प्रशासकीय परिपत्रक क्र. ४४६ दिनांक २८/०१/२००५
५) प्रशासकीय परिपत्रक क्र. १६ दिनांक ०१/०२/२००६

-------

उपरोक्त संदर्भिय परिपत्रकांव्दारे कर्मचाऱ्यांनी मुख्यालयाच्या ठिकाणी रहाण्याबाबतच्या सूचना वेळोवेळी जारी करण्यात आलेल्या आहेत. तथापि असे निदर्शनास आले आहे की, महाराष्ट्र राज्य विद्युत वितरण कंपनीतील अधिकारी/कर्मचारी अद्यापही त्यांच्या मुख्यालयाच्या ठिकाणी रहात नाहीत.

२. जे कर्मचारी त्यांच्या मुख्यालयाच्या ठिकाणी रहात नाहीत त्यांच्या बाबतीत संदर्भिय परिपत्रंकान्वये पुढील प्रमाणे सविस्तर सूचना दिलेल्या आहेत :-

अ) परिपत्रक क्र. ६९१४ दि. १६/७/१९९० व परिपत्रक क्र. ३१८६७ दि. २४/९/१९९० अन्वये सर्व कार्यकारी अभियंत्यांनी त्यांचे कार्यक्षेत्रातील कार्यरत कर्मचा-यांच्या नावे व्यक्तिशः पत्रे लिहून त्यांना मुख्यालयाच्या ठिकाणी रहाणेबाबतच्या सूचना द्याव्यात. जे कर्मचारी मुख्यालयाच्या ठिकाणी रहात नाहीत त्यांचे मासिक वेतन काढण्यात येऊ नये अशाही सूचनाही दिल्या आहेत. तसेच, प्रत्येक कर्मचा-यांने त्यांचा मुख्यालयात रहात असल्याबाबतचे प्रमाणपत्र व त्यासोबत स्थानिक वास्तव्याचा पत्ता देणे बंधनकारक करून असे प्रमाणपत्र संबंधित नियंत्रण अधिका-याने पडताळून खात्री केल्यानंतरच वेतन काढण्याच्या सूचनाही दिल्या होत्या. शिवाय परिमंडल स्तरावरील तपासणी पथकांनी त्यांच्या तपासणी अहवालात मुख्यालयात न रहाण-या कर्मचा-यांची नावे समाविष्ट करण्याच्या सूचना सुध्दा देण्यात आल्या होत्या.

ब) प्रशासकीय परिपत्रक क्र. ३८५ दि. २९/३/२००३ अनवये अशाही सूचना दिल्या आहेत की जे कर्मचारी मुख्यालयाच्या ठिकाणी रहात नाहीत अथवा सक्षम अधिका-यांची पूर्व परवानगी न घेता मुख्यालय सोडतात अशी कृती सेवा विनियमातील अनुसूची - 'ख' अनुसार गैरकृत्य मानावे व असे गैरकृत्य करणा-या कर्मचा-याविरुध्द शिस्तभंग कार्यवाही करावी. त्याचप्रमाणे संबंधित कार्यालय प्रमुखाने त्याच्या कार्यक्षेत्रात कार्यरत असलेल्या कर्मचा-यांच्या रहाण्याच्या ठिकाणांची नोंद करण्यासाठी नोंदवही ठेवावी व ती नोंदवही वेळोवेळी अद्ययावत करण्याच्या सूचनाही दिल्या होत्या. नियंत्रण अधिका-यांनी अनपेक्षित तपासणी (Surprise check) करुन मुख्यालयाच्या ठिकाणी न रहाणा-या कर्मचा-यांविरुध्द शिस्तभंगांतर्गत संक्षिप्त कार्यवाही करावी आणि अशा कर्मचा-यांचे गोपनीय अहवाल लिहितांना त्याची नोंद त्याच्या गोपनीय अहवालात सुध्दा करावी असेही निर्देश दिले होते. सदर सूचनांचे काटेकोर पालन करुन सूचनांचे उल्लंघन करणा-या कर्मचा-यांच्या विरुध्द कठोर कारवाई करण्याचे निर्देश सुध्दा प्रशासकीय परिपत्रक क्र. ४४६ दि. ८/१/२००५ अन्वये देण्यात आले होते.

३. सध्या मोठ्या प्रमाणात भारनियमन आहे त्यातच घोषित भारनियमनाशिवाय स्थानिक कारणांमुळे विद्युत पुरवठा खंडित होण्याच्या घटना अवेळी घडतात. अशावेळी संबंधित अधिकारी/कर्मचारी मुख्यालयात वास्तव्यास नसतील तर जनतेमध्ये असंतोष वाढतो, परिणामी कंपनीच्या कार्यालयावर हल्ले, कार्यालयीन मालमत्तेची नासधूस असे प्रकार वारंवार घडतात. त्याचप्रमाणे वीज वितरणाचे काम हे अत्यावश्यक स्वरूपाचे असल्याने या सर्व बाबींचा विचार करता संबंधित अधिकारी/कर्मचारी यांनी त्यांच्या मुख्यालयात वास्तव्यास असणे अत्यंत आवश्यक आहे.

४. तथापि, असे निदर्शनास आले आहे की महावितरण कंपनीतील अधिकारी/कर्मचारी त्यांच्या मुख्यालयाच्या ठिकाणी वास्तव्यास रहात नाहीत. या बाबींची गंभीर दखल घेण्यात आली असून या परिपत्रकाद्वारे सर्व संबंधित अधिकारी/कर्मचारी यांना पुन्हा निर्देश देण्यात येत आहेत की त्यांनी तातडीने मुख्यालयाच्या ठिकाणी वास्तव्यास रहावे.

५. वरील निर्देशांची परिणामकारक अमलबजावणी व्हावी म्हणून या संदर्भात पुन्हा एकदा खालील प्रमाणे आदेश देण्यात येत आहेत :-

(एक) सर्व कार्यकारी अभियंत्यानी त्यांच्या कार्यक्षेत्रातील कर्मचा-यांना व्यक्तीशः पत्रे लिहून त्यांना मुख्यालयाच्या ठिकाणी रहाण्या बाबतच्या सूचना द्याव्यात, शिवाय त्यांच्या स्थानिक वास्तव्याचा पत्ता असलेली नोंदवही विभागीय कार्यालयात व सर्व संबंधित कार्यालयांमध्ये ठेवावी. या नोंदवहीची तपासणी वरीष्ठ कार्यालयातील अधिका-यांनी त्यांच्या भेटीच्यावेळी करावी.

(दोन) दोषी कर्मचा-यांचे मासिक वेतन काढले जाणार नाही याबाबत दक्षता घ्यावी.

(तीन) सक्षम अधिका-यांची पूर्व परवानगी न घेता मुख्यालय सोडणे गैरकृत्य समजून त्या कर्मचा-या विरुध्द सेवा विनियमानुसार शिस्तभंगाची कारवाई करण्यात यावी.

(चार) नियंत्रण अधिकारी यांनी तापसणी करण्यासाठी संबंधित कर्मचा-यांच्या मुख्यालयास अनपेक्षित भेट द्यावी.

(पाच) अनपेक्षित तपासणीच्या वेळी संबंधित कर्मचारी मुख्यालयास न आढळल्यास त्याचे विरुध्द सेवा विनियमानुसार संक्षिप्त कार्यवाही (Summary Proceedings) करण्यात यावी. शिवाय गोपनीय अहवालात तशी नोंदही घेण्यात यावी.

(सहा) मुख्यालयाच्या ठिकाणी वास्तव्यास न रहाणे हे गंभीर गैरकृत्य समजून मुख्यालयाच्या वास्तव्यास न रहाणा-या अधिकारी/कर्मचारी यांच्या विरुध्द सेवा विनियम क्र. ८६ च्या तळटीपेनुसार संबंधित सक्षम अधिका-यांनी कडक कारवाई करावी व अशी कारवाई करण्याबाबत कुचराई करणा-या सक्षम अधिका-यां विरुध्दही त्यांच्या वरिष्ठ अधिका-यांनी कडक कारवाई करावी.

७. सदर परिपत्रकातील सूचनांची सर्व अधिकारी/कर्मचारी यांनी नोंद घ्यावी आणि काटेकोरपणे पालन करावे.

८. मुख्य अभियंत्याच्या कार्यालयाशी/मंडल कार्यालयांशी संल्लग्न असलेल्या तपासणी शाखांनी उपरोक्त सूचनांचे काटेकोरपणे पालन होते आहे किंवा कसे याबाबत कसून तपासणी करावी आणि याबाबत दोषी आढळलेल्या कर्मचा-यांची नावे संबंधित मुख्य अभियंता/अधीक्षक अभियंता यांच्या निदर्शनास आणावीत.

९. संबंधित कार्यकारी संचालक यांनी त्यांच्या कार्यक्षेत्रातील क्षेत्रीय कार्यालयांमधील सर्व अधिकारी/कर्मचारी त्यांच्या मुख्यालयाच्या ठिकाणी वास्तव्यास रहाण्यासाठी वर नमूद केलेल्या सूचनांची परिणामकारकपणे अंमलबजावणी होण्याबाबत योग्य ती दक्षता घ्यावी.

(डॉ. अजय भूषण पांण्डये)
व्यवस्थापकीय संचालक

प्रत :
महाराष्ट्र राज्य विद्युत वितरण कंपनीच्या प्रेषण यादीप्रमाणे

C:\O&M\Adm.cir-FN-890.doc